30 JAN 2026

लोकमत



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी मोफत एचपीव्ही लसीकरण शिबिरात ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

# विद्यापीठात ४५० विद्यार्थ्यांना मोफत एचपीव्ही लस

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवत शिवाजी विद्यापीठात गुरुवारी मोफत एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये ४५० हून अधिक विद्यार्थ्यांना लसीकरणाचा लाभ मिळाला.

अवघ्या दोन दिवसांच्या कालावधीत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी या उपक्रमाचे समन्वय केले. या उपक्रमासाठी शासकीय वैद्यकीय रुग्णालय तसेच शिवाजी विद्यापीठ प्रशासनाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांमध्ये एचपीव्ही विषाणूविषयी जनजागृती निर्माण होण्यासोबतच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेस चालना देणारा हा उपक्रम ठरला, असे लसीकरण शिबिर घेणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

30 JAN 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरणाचा विचार करणे गरजेचे

■ बी. एस. सातपुते : विलासराव शिंदे महाविद्यालयात अग्रणी कार्यशाळा



आष्टा / प्रतिनिधी

नवीन शैक्षणिक धोरणाचा गांभीर्याने विचार करुन विद्यार्थ्यांनी ध्येय मोठे ठेवावे व त्यादृष्टीने वाटचाल करावी, अपयश आले म्हणून नाराज होऊ नये. समाजात कमी गुणवत्ता असणारी मुले सुद्धा आपले नाव मोठे करतात, असे मत प्रा. डॉ. बी. एस. सातपुते यांनी व्यक्त केले.

येथील विलासराव शिंदे महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय कार्यशाळा झाली त्यावेळी ते बोलत होते. उद्घाटन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. बी. एस. सातपुते यांच्याहस्ते व संस्थेचे चेअरमन वैभव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. चेअरमन वैभव शिंदे म्हणाले, स्पर्धेच्या युगात गुणवत्ता महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपले करिअर स्वतः घडवले पाहिजे त्यासाठी स्पर्धा परीक्षेबरोबरच खेळामध्येही प्राविण्य मिळवले पाहिजे.

स्वागत प्रा. संदीप चव्हाण यांनी केले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. माणिकराव पाटील यांनी कार्यशाळेचे उद्देश व महाविद्यालयाचा आढावा घेतला. यावेळी प्रा. विजयानंद गद्रे, प्रा. संजय सावळवाडे यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व व महाविद्यालयीन स्तरावरील स्पर्धा परीक्षांची तयारी या विषयावर मार्गदर्शन केले.

योग अभ्यासामुळे माणसांचे मन व शरीर निरोगी राहते. त्याला कोणतीही व्याधी जडत नाही. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आवड व वेळेचे नियोजन महत्त्वाचे आहे. सतत सरावाने निश्चित यश मिळते असेही सांगितले.

कार्यशाळेस पलूस, रामानंदनगर, भिलवडी, कडेगाव व बोरगाव महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग होता. त्यांना प्रमाणपत्र वितरित केले. यावेळी चेअरमन वैभव शिंदे, नगराध्यक्ष प्रा. विशाल शिंदे, प्राचार्य माणिकराव पाटील उपस्थित होते. प्रा. आकांक्षा बिरनाळे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. काजल अब्दागिरे यांनी केले. कार्यशाळेस विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

30 JAN 2026

तरुण भारत

# डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने दिला जाणारा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मराठीतील ख्यातनाम अनुवादक, कवी व



समीक्षक प्रा. चंद्रकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार २४ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ लेखक प्रा.राजन गवस यांच्या हस्ते दिला जाणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी हे असतील. रोख रक्कम ५१ हजार रुपये व सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रा. चंद्रकांत पाटील यांची समीक्षा ही मराठीतील महत्त्वाची समीक्षा आहे. सर्जनशील लेखनाबरोबरच त्यांनी अनुवाद व समीक्षा या प्रकारात महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांच्या लेखनाचे स्वरूप हे द्वैभाषिक स्वरूपाचे आहे. मराठी कविता भारतीय स्तरावर नेण्यामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. मराठी हिंदीतील सांस्कृतिक अनुबंध अधिक विकसित करण्यामध्ये प्रा. पाटील यांचे लेखन महत्त्वाचे ठरले आहे. आजवरच्या त्यांच्या एकंदर समीक्षा कारकीर्दीचा सन्मान म्हणून या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात येत आहे. या पुरस्काराच्या निवड समिती सदस्य म्हणून प्रा. एकनाथ पगार (देवळा), प्राचार्य गोविंद काजरेकर (बांदा) व प्रा. नंदकुमार मोरे (कोल्हापूर) यांनी काम पाहिले.

30 JAN 2026
लोकमत

# तज्ज्ञांकडून 'भारतीय विद्येचा परिचय'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रामध्ये पीएम-उषा योजनेंतर्गत आयोजित केलेल्या 'भारतीय विद्येचा परिचय' हा पाच दिवसांचा बहुविद्याशाखीय मूल्यवर्धित अभ्यासक्रमात तज्ज्ञांनी भारतीय विद्या, पुरातत्त्वशास्त्र आणि स्थानिक इतिहासाच्या पैलूंवर प्रकाश टाकला.

या अभ्यासक्रमात सोनाली शाह यांनी भारतीय विद्येचा उगम आणि जागतिक इतिहास मांडला. डॉ. योगेश प्रभुदेसाई यांनी पुरातत्त्वशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करत ब्रह्मपुरी येथील उत्खनन, करवीर महात्म्य संस्कृत ग्रंथ आणि प्राचीन ताम्रपटांद्वारे भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवले. डॉ. तन्मय भोळे यांनी संस्कृत व प्राकृत ग्रंथसंपदेचे महत्त्व सांगितले. योगिनी आत्रेय यांनी ब्राह्मी लिपीचे प्राथमिक धडे दिले. डॉ. हर्षदा वीरकुड यांनी विरगळींचा दृष्टिकोन मांडला. मानसिंग चव्हाण, समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. उमाकांत हत्तीकट यांनी यासाठी परिश्रम घेतले.

30 JAN 2026

सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजमध्ये न्यू होरायझन २ के २६ आय.टी. स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना डॉ. अरुण पाटील. शेजारी उजवीकडून प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, बी. बी. बोराडे, आमदार जयंत आसगावकर, डी. जी. किल्लेदार, डॉ. ए. ए. कलगोंडा.

# समाजाची गरज ओळखून नव्या संशोधनाकडे वळा : डॉ. पाटील

## न्यू कॉलेजमध्ये न्यू होरायझन आयटी स्पर्धा

कोल्हापूर, ता. २९ : संगणक क्षेत्रात देश-परदेशात संधी आहेत, त्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःचे कौशल्य विकसित करावे, परदेशी भाषां अवगत करावी, समाजाची गरज ओळखून नव्या संशोधनाकडे विद्यार्थ्यांनी वळावे, त्यावर आधारीत अॅप आणि रोबोटिक तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे, असे पुणे विश्वकर्मा कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँन्ड सायन्समधील प्राचार्य डॉ. अरुण पाटील यांनी सांगितले.

न्यू कॉलेज येथे कॉम्प्युटर सायन्स (एंटायर) विभागाच्या 'न्यू होरायझन २ के २६' ही आंतर महाविद्यालयीन आयटी स्पर्धा झाली. आमदार जयंत आसगांवकर उपस्थित होते. प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे अध्यक्ष बी. जी. बोराडे अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील यांनी या संस्थेचा माजी विद्यार्थी असल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

आमदार आसगांवकर यांनी अद्ययावत तंत्रज्ञानाची ओळख आणि आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी अशा प्रकारची स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले. श्री. बोराडे यांनी विद्यार्थ्यांना अद्ययावत प्रयोगशाळा आणि तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाईल, अशी ग्वाही दिली. प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. ए. कलगोंडा यांनी ओळख करून दिली. प्रा. एस. जी. देशमुख यांनी न्यू होरायझन स्पर्धेबद्दल माहिती दिली. शिवाजी विद्यापीठ आयोजित शार्क टॅक कम हॅकेथॉन स्पर्धेत 'रुमिफाय' अॅपला प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल सोहम देशपांडे याचा सत्कार केला. तस्लिमा गोलंदाज हिने आभार मानले. सानिया चौगुले, अनिरुद्ध पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अश्विनी अष्टेकर यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, खजानीस वाय. एस. चव्हाण, पी. सी. पाटील, वाय. एल. खाडे, उदय पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. धमकले, एम. वाय. कांबळे आदी उपस्थित होते.

3 0 JAN 2026

जनप्रवास

# ग्रंथ विक्रेत्यांना ग्रंथोत्सवात सहभागी होण्याबाबत आवाहन

**जनप्रवास : कोल्हापूर**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग व ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्यावतीने कोल्हापूर जिल्हा ग्रंथोत्सवाचे आयोजन १४ व १५ फेब्रुवारी रोजी इंजुबाईदेवी सांस्कृतिक भवन, गारगोटी (सोनाळी) येथे करण्यात येणार आहे.

या ग्रंथोत्सवाच्या कालावधीत सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत ग्रंथ प्रदर्शन व विक्रीसाठी स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच ग्रंथालयांशी संबंधित सॉफ्टवेअर कंपन्यांचे स्टॉलही लावण्यात येणार आहेत. ग्रंथ प्रदर्शन/विक्री स्टॉलसाठी इच्छुकांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय राजारामपुरी ११ वी गल्ली येथे लेखी पत्रासह ५ फेब्रुवारीपर्यंत संपर्क साधावा. या ग्रंथोत्सवामध्ये अधिकाधिक प्रकाशक, ग्रंथ विक्रेते तसेच ग्रंथालयांशी संबंधित कंपन्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सदस्य सचिव अपर्णा वाईकर यांनी केले.

30 JAN 2026

पुढारी

# विवेकानंद कॉलेजमध्ये आज होणारे युवा साहित्य संमेलन स्थगित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद कॉलेज वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या वतीने शुक्रवार, दि. ३० रोजी होणारे पाचवे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे स्थगित करण्यात आले असून पुढे ढकलण्यात आले आहे.

संमेलनाची नवीन तारीख लवकरच कळविली जाईल, अशी माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी दिली आहे.

30 JAN 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठात अजित पवार यांना श्रद्धांजली

**कोल्हापूर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठात भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहात शोकसभेचे आयोजन केले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. अजित पवार यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. शोकसभेला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक उपस्थित होते.

30 JAN 2026
लोकमत

# #क्विक Update

## शिवाजी विद्यापीठाकडून संगीत रजनी स्थगित

**कोल्हापूर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच विमान अपघातात निधन झाले. या दुर्दैवी निधनामुळे राज्य शासनाने तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे २९ आणि ३० जानेवारी २०२६ रोजी आयोजित केलेली राजर्षी शाहू संगीत रजनी स्थगित केली आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी दिली आहे.

3 0 JAN 2026

पुढारी

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिवाजी विद्यापीठात श्रद्धांजली

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे एक कुशल, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे, तडफदार नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठात मान्यवरांकडून श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी राजर्षी शाहू सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. अजित पवार यांना शिवाजी विद्यापीठाप्रती आस्था होती. त्यामुळेच त्यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या अर्थसंकल्पात सुवर्णमहोत्सव निधीची भरीव तरतूद केली.

यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. शोकसभेला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक उपस्थित होते.

30 JAN 2026 लोकसत्ता जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरात विविध संस्थांकडून अजित पवारांना आदरांजली



शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना गुरुदत्त शुगरचे अध्यक्ष माधवराव घाटगे आणि सहकारी.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे काल अपघाती निधन झाले. आज कोल्हापुरात विविध संस्थांच्या वतीने त्यांना त्यांच्या कार्याचे स्मरण करीत श्रद्धांजली वाहण्यात आली.

कोल्हापूर जिल्हा व शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शहर कार्यालयात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय सचिव बाजीराव पाटील, शहराध्यक्ष आर. के. पोवार, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल घाटगे, उत्तर विधानसभा अध्यक्ष गणेश जाधव, महिला अध्यक्षा पद्मजा तिवले, सेवादलाध्यक्ष महादेव पाटील, निरंजन कदम, किसन कल्याणकर, पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. धडाडीचे नेतृत्व असणाऱ्या कार्यक्षम नेतृत्वास कायमचे मुकलो, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

**अजितदादांचे महाविद्यालय गहिवरले**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शिक्षण झालेल्या येथील शहाजी महाविद्यालयाच्या कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे सभागृहात मौन बाळगून उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली. या महाविद्यालयात अजित पवार यांनी १९७८ साली वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षात शिक्षण घेतले होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, अजित पवार यांनी राजकीय क्षेत्रात मोठे काम उभे केले होते. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले आहे.

गुरुदत्त शुगर्सतर्फे श्रद्धांजली

शिरोळ तालुक्यातील टाकळीवाडी येथील श्री गुरुदत्त शुगर्स मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कारखान्याचे अध्यक्ष माधवराव घाटगे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार हे महाराष्ट्रातील साखर उद्योगातील अभ्यासू, जाणते नेतृत्व होते. त्यांच्या अपघाती मृत्यूमुळे महाराष्ट्रातील सर्व साखर उद्योग पोरका झाला आहे. गुरुदत्त शुगर्सच्या उभारणीमध्ये त्यांनी मोलाची मदत केली होती, अशी भावना व्यक्त केली. कारखान्याचे कार्यकारी संचालक राहुल घाटगे, संचालक शिवाजीराव माने - देशमुख, शिवाजी सांगले, धोंडीराम नागणे, अण्णासाहेब पवार, बाळासाहेब पाटील, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**शिवाजी विद्यापीठाची श्रद्धांजली**

शिवाजी विद्यापीठामध्ये गुरुवारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभेचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. अजित पवार यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव सुवर्णमहोत्सव निधीची तरतूद केली. त्यामधून विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, बाळासाहेब देसाई अध्यासन, राजर्षी शाहू म्युझियम कॉम्प्लेक्स इत्यादी उपक्रमांची उभारणी करता येऊ शकली, असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मनोगत व्यक्त केले.

3 0 JAN 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात आदरांजली

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे एक कुशल, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठात आज श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात शोकसभा झाली.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोक प्रस्तावाचे वाचन केले. अजित पवार यांना शिवाजी विद्यापीठाप्रती आस्था होती. त्यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव सुवर्णमहोत्सव निधीची तरतूद केली. त्यामधून विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, बाळासाहेब देसाई अध्यासन, राजर्षी शाहू म्युझियम कॉम्प्लेक्स आदी उपक्रमांची उभारणी करता येऊ शकली, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, निखिल गायकवाड, श्रीकृष्ण महाजन यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, अधिकारी, सेवक उपस्थित होते.

30 JAN 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात अजित पवार यांना श्रद्धांजली

कोल्हापूर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे एक कुशल, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे, तडफदार आणि उमदे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठात गुरुवारी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

3 0 JAN 2026

लोकमत

# विद्यापीठात अजित पवार यांना श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे एक कुशल, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय जाण असणारे, तडफदार आणि उमदे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठात गुरुवारी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात ही शोकसभा झाली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. अजित पवार यांना शिवाजी विद्यापीठाप्रति आस्था होती. त्यामुळेच त्यांनी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने अर्थसंकल्पात भरीव सुवर्णमहोत्सव निधीची तरतूद केली, असे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. आलोक जत्राटकर, सागर लांडे, डॉ. निखिल गायकवाड, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. शोकसभेला डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक, अधिकारी उपस्थित होते.